# होय मी जिजाबाई

सर्वांना नमस्ते,

ओळखलंत का मला? मी जिजाबाई,

होय शिवबाच्या मातोश्री.

अवघ्या महाराष्ट्राच्या मातीवर पारतंत्र्याचा अंधार पसरलेला असताना, सिंदखेडच्या म्हाळसाराणी आणि लखुजीराजे यांच्या घरी आमचा जन्म झाला. **आमचं नाव "जिजा" ठेवण्यात आलं.** माझ्या अगोदर 4 भावडांचा जन्म झाला असल्याने माझ्या जन्माची आस लावून बसले होते. सर्वांना एवढा आनंद झाला की **आमच्या वडिलानी हत्तीवरून साखर वाटली, पूर्ण गावाला जेवण दिले आणि गावात उत्सव साजरा झाला.** लेकीच्या जन्माचा आनंद कसा साजरा करायचा हे आमच्या वडिलांनी दाखवून दिले.

आम्ही पाहतो की **आज मुली लहान असताना मुलींना खेळायला भांडीकुंडी, भातुकली दिली जाते.** लहान असताना आबासाहेबांनी आम्हाला विविध कौशल्य शिकवली. **तलवार चालवणे, घोडेस्वारी करणे हे तर आम्ही शिकलोच,** त्याबरोबरच संस्कृत, उर्दू, फारशी या भाषाही शिकलो. नामदेव, ज्ञानोबा या संतांच्या विचारांनी तर आमच्या मनावर स्वातंत्र्याचे, समानतेचे, माणुसकीचे संस्कार केले.

एक दिवस आम्ही आबासाहेब लखोजीराजेंना एक प्रश्न विचारला, **"सगळीकडे अन्याय होत असताना इथली रयत पेटून का उठत नाही?"** त्यांनी आम्हाला सांगितले, "जिजा, सगळी लोकं जाती-धर्माच्या भेदाभेदात सगळे अडकून पडलेत. या रयतेला पारतंत्र्याची चीड नाही आणि स्वातंत्र्याची ओढ नाही." आम्ही पुन्हा विचारले, “मग या रयतेला अन्यायाविरोधात कसे उभे करता येईल?” आबासाहेब आमच्याकडे बघत म्हणाले, "जिजा या रयतेच्या **मनातून भेदाभेद दूर केला पाहिजे.** त्यांना आपण सगळे एक आहोत याची जाणीव करून दिली पाहिजे. तेव्हाच त्यांच्या डोळ्यात स्वातंत्र्याचे स्वप्न दिसू लागेल." आबासाहेबांचे ते शब्द आजही आमच्या मनावर कोरले आहेत .

पुढे आमचा विवाह शहाजीराजें यांच्याशी झाला. शहाजीराजांनी आणि आम्ही रयतेच्या स्वराज्याचे स्वप्न पाहिले. अशातच मोठ्या धामधुमीच्या काळात शिवबांचा जन्म झाला आणि महाराष्ट्राच्या क्षितिजावर स्वातंत्र्याचा सूर्य उगवला.

आम्ही शिवबाला लहानपणी शिकवलं होतं, सर्व जाती धर्माच्या मावळ्यांना स्वराज्यात सामील करा. स्त्रियांचा सन्मान राखा. शिवबांनी आमची शिकवण कधीच मोडली नाही. आम्ही पाहिलेले स्वप्न शिवबाने सत्यात उतरवले. सर्व जाती-धर्माच्या मावळ्यांना सोबत घेऊन शिवबाने स्वराज्य निर्माण केले. मराठी मुलखात रयतेला सन्मानाची, समानतेची, आधाराची वागणूक मिळू लागली. त्यामुळेच स्वराज्यात अवघी रयत गुण्या गोविंदाने राहत होती. माणसं माणसाशी माणुसकीने वागत होती. आमचे

आप्पासाहेब लखोजीराजांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही माणसामाणसातील भेद दूर करून माणसं जोडली. **स्वराज्य निर्माण झालं. त्याचं सुराज्य करण्याची कामगिरी आता तुमच्यावर आहे.**

**तुमचं आमचं नातं काय, जय जिजाऊ जय शिवराय!**

**इतर महत्त्वाची माहिती** –

1. जिजाबाई सती गेल्या नाहीत.
2. शिवाजी महाराजांनी त्यांची सुवर्णतुला केली. (त्यावेळी जिजाई विधवा होत्या.)
3. त्यांनी अंधश्रद्धा पाळल्या नाहीत.
4. रयतेची काळजी - मातोश्री जिजाऊ रयतेची मुलाप्रमाणे काळजी घेत असत. स्वराज्यातील विठोजी हैबतरावाच्या मुलीचे लग्न ठरले होते. विठोजीची आर्थिक परिस्थिती हलाकीची होती. ही बाब जिजाऊंना समजताच त्यांनी विठोजीच्या मुलीच्या लग्न खर्चासाठी 25 होन (पैसे) दिले. तसेच 500 लोकांच्या जेवणाचे सामान विठोजी हैबतरावाकडे पाठवून दिले.
5. प्रत्यक्ष राज्यकारभार केला. - शिवाजी महाराज लहान असताना त्यांनीच तर राज्यकारभाराची धुरा सांभाळली होती. विविध प्रकारचे खटले चालू असताना त्या शिवबांना सदरेवर बसवायच्या आणि त्यांच्या पुढे खटल्यांवर निकाल द्यायच्या. त्यामुळे लहानगे शिवाजी राजे सुद्धा घडत गेले. शिवाजी राजे लहान असताना जिजाबाईंनी राज्यकारभार सांभाळला, असं नाही. ज्यावेळी शिवाजी महाराज मोहिमेवर असत त्यावेळी स्वराज्याचा कारभार जिजाबाईंनी पाहिला. अनेक महिने आग्र्याच्या कैदेत होते तेव्हासुद्धा स्वराज्याचा कारभारज जिजाबाई पाहत होत्या.

इतकंच नाही, तर त्याच काळात आदिलशहाने रांगणा किल्ल्यावर स्वारी केली. त्यावेळी जिजाऊंनी एका खास मोहीमेचं नेतृत्व केलं आणि रांगणा किल्ला जिंकून घेतला (15 ऑगस्ट 1666). या मोहिमेच्या वेळी जिजाऊ 68 वर्षे वयाच्या होत्या. यावरून दिसतं की कर्तृत्वाला वयाची सीमा नसते.

तर वेळप्रसंगी स्वतः मैदानात उतरायला तयार होत्या. सिद्धी जौहरच्या वेढ्यात शिवाजी अडकले असताना त्या स्वतः पन्हाळ्याच्या दिशेने निघण्याच्या तयारीत होत्या. नेताजी पालकरांनी त्यावेळी जिजाबाईंना विनंती केली की आम्ही जिवंत असताना तुम्ही तसदी घेऊ नका.

जिजाऊअआणि शिवराय 1641 साली पुणे परगण्यात राहायला आल्या. त्यावेळी पुण्याची अवस्था खूपच दयनीय होती. मुरार जगदेव सारख्या शहाजीराजांच्या शत्रूंनी त्यांना उध्वस्त करण्याच्या हेतूने त्यांच्या जहागिरीला अर्थात पुण्याला उजाड केलं होतं. असं म्हणतात की त्याने पुण्यावर **गाढवाचा नांगर फिरवला आणि पहार मारली** होती. म्हणजे इथल्या प्रदेशात **कधीही समृद्धी येणार नाही**, याचं ते सूचक होतं. तो अशुभ संकेत होता. त्यामुळे सामान्य जनता भीतीपोटी गाव सोडून गेले होते. शेती नष्ट झाली होती. जंगले वाढली होती आणि रानात लांडगे माजले होते.

जिजाबाईपुढे आव्हान होतं की लोकांच्या मनातून ही भीती कशी काढायची, इथं गावं आणि शेतं पुन्हा कशी वसवायची? लोकांच्या मनातून भीती काढण्यासाठी सर्वप्रथम पुण्यात **लाल महाल बांधून जिजाबाई स्वतः शिवबांना घेऊन या उजाड भागात राहायला लागल्या.** त्यामुळे लोकं सुद्धा यायला तयार झाली. सुरुवातीच्या काळात शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट दिली. लांडगे माजले होते, त्यांनी शेती उध्वस्त केली असती. त्यामुळे लांडगे मारणाऱ्या शूर माणसांना बक्षीस दिले. त्यामुळे हळूहळू वस्त्या वसल्या आणि जहागिरीला भरभराट आली. ‘गाढवाचा नांगर फिरवला, आता मी माझ्या लेकराला घेऊन तिथं कसं राहू’, असा अंधश्रद्ध विचार करत जिजाबाई राहिल्या नाहीत, तर स्वतः मेहनत घेऊन त्यांनी उजाड झालेली वसाहत पुन्हा वसवली.